## परिशिष्ट ‘डी’

## जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत जागेवरील प्रवेश प्रक्रिया केद्रांवर (**Spot Admission Process Center**) खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर ०१ सप्टेंबर,२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) जागेवरील प्रवेश फेरी फक्त ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील विद्यालयांच्या ठिकाणी जागेवरील प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर ज्या ज्या विद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील **परिशिष्ट “ई”** मध्ये देण्यात आला आहे.

(२) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या विद्यालयाशी संबंधित ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर दि.०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.३० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(३) प्रवेश प्रक्रिया केंद्राच्या प्रमुखांनी उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर ‘जागेवर प्रवेश फेरीच्या’ (Spot Admission Round) शेवटच्या दोन दिवशी म्हणजेच दि.०५ सप्टेंबर,२०१८ **रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’नी घ्यावी.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'च्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(६) दि. ०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर करण्यात यावी.

(७) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(८) 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक विद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(९) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)